28-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 27-05-2025 21:41 Page 1



# मलभाट परिसरात सांडपाण्याची समस्या गंभीर

## परिसरात दुर्गंधी | नागरिकांच्या आरोग्यावर मोठा धोका

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** मडगावमधील आके विभागातील मलभाट परिसरात गेल्या काही दिवसांपासून सांडपाण्याच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले असून, या परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे. सिने विशांत थिएटरच्या मागील भागात एक चेंबर तुंबल्यामुळे कच्चे सांडपाणी जवळच्या नाल्यात सातत्याने वाहत आहे.

या प्रकारामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, रहिवाशांनी प्रशासनाकडून तात्काळ आणि कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते सॅव्हियो कुतिन्हो यांनी परिस्थितीबाबत तीव्र संताप व्यक्त करत म्हटले की, सांडपाणी उघड्या गटारांमधून वाहतेच आहे, पण आता ते काही घरांमध्येही शिरत आहे. त्यामुळे असह्य दुर्गंधी आणि



अपायकारक स्थिती निर्माण झाली आहे.

कुतिन्हो यांनी यापूर्वीही अशीच समस्या निर्माण झाल्याचे नमूद करत, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ताशेरे ओढले. ही समस्या नवीन नाही. गेल्या वर्षीही अशीच परिस्थिती होती, पण त्यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, असे ते म्हणाले.

मडगाव नगरपालिका परिषदेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, कुतिन्हो यांनी सांगितले की, अलीकडेच सांडपाणी कक्ष स्वच्छ करण्यासाठी एक रोबोटिक मशिन खरेदी करण्यात आले, मात्र ती सध्याच्या चेंबर डिझाइनसाठी उपयुक्त न ठरल्यामुळे ती वापरातच नाही. परिणामी, स्वच्छता कर्मचाऱ्यांना पुन्हा मॅन्युअल पद्धतीने काम करावे लागत आहे.

पावसाळा तोंडावर असताना, या समस्येने सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत गंभीर चिंता निर्माण केली आहे. दूषित पाण्यामुळे रोगराई पसरू शकते, याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरपालिका प्रशासनाकडे तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली असून, केवळ तात्पुरते नव्हे तर दीर्घकालीन आणि ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे. आरोग्य आणि सुरक्षितता या बाबींचा विचार करून रचनात्मक सुधारणा करण्यात याव्यात. तात्पुरते आणि जुजबी उपाय आता स्वीकारार्ह नाहीत, असे कुतिन्हो यांनी स्पष्ट केले. या परिस्थितीने मडगावसारख्या झपाट्याने विकसित होत असलेल्या शहरात कार्यक्षम नागरी पायाभूत सुविधा आणि जबाबदार प्रशासनाची गरज अधोरेखित झाली आहे. मलभाट परिसरातील समस्या ही संपूर्ण शहरासाठी एक इशारा मानली जात आहे.

---

## निवडक

### राष्ट्रोळी देवस्थानचा आज शिखर कलश स्थापना

■ टीम दैनिक हेराल्ड



**पीर्ण, दि. २७ :** येथील श्री राष्ट्रोळी माटीयेचा अधिकारी देवस्थानचा बुधवार दि. २८ रोजी वास्तू यजन व शिखर कलश स्थापना करण्यात येणार आहे.
त्यानिमित्त सकाळपासून विधिवत पूजा, त्यानंतरकलश स्थापना यजमान श्री. जगननाथ व सौ. ज्योती नाईक आणि वास्तू यजन श्री. गोविंद आणि सौ. अनुराधा नाईक यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. १२.३० वाजता महाप्रसाद होईल. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे, असे कळविण्यात आले आहे.

---

### सम्राट संगीत सितारा गायन स्पर्धेची प्राथमिक फेरी बेळगावात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २७ :** सम्राट क्लब इंटरनॅशनल गोवा राज्य आयोजित सम्राट संगीत सितारा ही गोव्यातील प्रतिष्ठेची स्पर्धा म्हणून ओळखली जाते.भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गायन स्पर्धेचे यंदाचे हे एकोणीसावे वर्ष आहे. वय वर्षे १४ ते २५ वयोगटातील नवोदित शास्त्रीय गायकाना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षी १४ जूनपासून या स्पर्धेचा प्रारंभ होत आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात स्पर्धेचा महाअंतिम सोहळा रवींद्र भवन साखळी गोवा येथे होणार आहे. विजेत्यांना भरघोस पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विजेत्याला रोख रु. २५००० व सोन्याचे नाणे, उपविजेत्याला रोख रु. १५००० व सोन्याचे नाणे, तृतीय रोख रु. १०००० व सोन्याचे नाणे तसेच प्रतयेकी रु. ५००० तीन उत्तेजनार्थ पारितोषिके व चांदीची फ्रेम अशी बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. गोवा, महाराष्ट्र व कर्नाटक अशा तीन राज्यातील नवोदित शास्त्रीय गायकांसाठी ही स्पर्धा आहे. उत्तर गोवा, दक्षिण गोवा, सावंतवाडी व बेळगांव अशा विविध भागात होणाऱ्या प्राथमिक फेरीतून स्पर्धक निवडले जाणार आहेत. सम्राट संगीत सिताराची दुसरी प्राथमिक फेरी रविवार दि. १५ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता लोकमान्य रंगमंदिर कोनवाळ गल्ली बेळगांव येथे संपन्न होणार आहे. बेळगाव येथे प्रसिद्ध अशा लोकमान्य रंग मंदिरच्या सभागृहात होणाऱ्या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला किरण ठाकुर यांची खास उपस्थिती लाभणार आहे. बेळगाव,धारवाड व कोल्हापूर अशा विविध भागांतून स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सम्राट क्लबचे माजी अध्यक्ष व बेळगांव स्पर्धा आयोजनाचे प्रमूख सम्राट दीपक नार्वेकर तसेच सम्राट क्लब केरीचे अध्यक्ष संजय गांवकर व सम्राट संगीत सितारा चेअरमन अमोल बेतकीकर यांनी केले आहे. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी ९५५२५९२८४०, ९७६४९५६७६३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### खोलाच्या सरपंचपदी प्रज्ञा कामत बिनविरोध



**खोला : सरपंचा प्रज्ञा कामत यांना शुभेच्छा दिल्यानंतर माजी उपमुख्यमंत्री बांबू उर्फ चंद्रकांत कवळेकर, भाजपा दक्षिण गोवा अध्यक्ष प्रभाकर गावकर, पंचायत मंडळाचे सदस्य हितचिंतक, भाजप कार्यकर्ते व इतर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २७ :** खोला पंचायतच्या कार्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत खोला पंचायतीच्या सरपंच म्हणून प्रज्ञा कामत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सरपंचा सौ. कामत यांना माजी उपमुख्यमंत्री बांबू उर्फ चंद्रकांत कवळेकर, भाजपा दक्षिण गोवा अध्यक्ष प्रभाकर गावकर, पंचायत मंडळाचे सदस्य हितचिंतक व भाजप कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

---

### कोठंबी-पाळीत आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २७ :** बुधवार दि. २८ मे २०२५ रोजी कोठंबी- पाळी वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने वरील वेळेत कोठंबी गावात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### रावण सत्तरी येथे आज 'सागरा प्राण तळमळला'

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २७ : वीर सावरकर युवा मंच,डिचोलीतर्फे श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान,रावण सत्तरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त बुधवार दि.२८ मे २०२५ रोजी रावण येथील देवस्थानात संध्या.६.३० वा.स्वरा क्रिएशन प्रस्तूत व शैलेश शिरोडकर निर्मित स्वातंत्रवीर सावरकर यांच्या निवडक गाण्यांवर आधारित मराठी संगीताचा कार्यक्रम 'सागरा प्राण तळमळला' सादर करण्यात येणार आहे.या कार्यक्रमात कु.स्वरा शिरोडकर,कु.प्राची आत्माराम गावस,सौ.सौम्या शिरोडकर व विजय शिरोडकर गायन करणार आहेत.त्यांना हार्मोनियमवर शैलेश शिरोडकर,तबल्यावर दिगंबर वेळगेकर,टाळ साथ चंद्रकांत शिरोडकर करणार आहेत.

---

# पारंपरिक टॅक्सी चालकांनी घेतली सरदेसाई यांची भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** गोव्यातील पारंपरिक टॅक्सी चालकांच्या एका शिष्टमंडळाने फातोर्डाचे आमदार आणि गोवा फॉरवर्ड पक्षाचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांची भेट घेतली. त्यांनी २० मे रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झालेल्या गोवा ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५ या नव्या धोरणाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली.



या शिष्टमंडळाशी संवाद साधताना आमदार सरदेसाई यांनी मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी ही प्रमुख भागधारकांशी कोणतीही सल्लामसलत न करता झाल्याबद्दल गंभीर आक्षेप नोंदवले. त्यांनी विधानसभेच्या मागील अधिवेशनातील चर्चेची आठवण करून देत स्पष्ट केले की, टॅक्सी व्यवसायासंदर्भात कोणताही धोरणात्मक किंवा नियामक बदल करताना संबंधित भागधारकांशी चर्चा करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट ठरले होते. सदनात दिलेल्या या आश्वासनाचे स्पष्ट उल्लंघन झाले आहे.

सरदेसाई यांनी याआधी सरकारने टॅक्सी क्षेत्रात केलेल्या उपाययोजनांचा पुनरावलोकन करत टीका केली. ते म्हणाले, सरकारने यापूर्वी मीटर, स्पीड गव्हर्नर आणि जीपीएस ट्रॅकिंग उपकरणे बंधनकारक केली होती, पण ही सर्व प्रणाली अयशस्वी ठरल्या. त्यांचा लाभ केवळ उपकरणांचे पुरवठादार आणि काही मंत्र्यांनाच झाला. त्यामुळे आता प्रश्न उपस्थित होतो की, ही नवीन मार्गदर्शक तत्त्वे देखील कोणत्यातरी मंत्र्यांच्या फायद्यासाठीच आहेत का?

गोव्यात बाहेरील ॲग्रीगेटर कंपन्यांचा वाढता प्रवेश यावर त्यांनी विशेष चिंता व्यक्त केली. किती ॲग्रीगेटर्सना परवाने दिले जाणार, याची कोणतीही स्पष्टता नाही. देशभरातील कंपन्या गोव्यात येत आहेत. आपण पर्यटनाचं हेच मॉडेल स्वीकारायचं का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

गोव्याच्या आदरातिथ्य आणि स्थानिक महत्त्वाचा संदर्भ देत सरदेसाई म्हणाले की, पर्यटक गोव्याला त्याच्या संस्कृती, स्थानिक सौंदर्य आणि आदरातिथ्यासाठी भेट देतात. जर पर्यटनाच्या सेवा बाहेरील कंपन्यांकडे गेल्या, तर गोव्याची मूळ ओळखच हरवेल. पारंपरिक टॅक्सी चालक हे या भूमीचे पुत्र . हेच गोव्याच्या पर्यटन अर्थव्यवस्थेचे खरे लाभार्थी असले पाहिजेत. तरीही, त्यांनी पर्यटन सेवा परवडणाऱ्या आणि स्पर्धात्मक राहाव्यात यावर भर दिला. सेवांचा खर्च इतका वाढू नये की, पर्यटक गोव्यात येणेच बंद करतील. आपण स्थानिक हित आणि पर्यटनाचा विकास यामध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

सरदेसाई यांनी स्पष्ट केले की गोवा फॉरवर्ड पार्टी नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा सखोल अभ्यास करणार असून, गोव्याच्या स्थानिक जनतेच्या उपजीविकेचे संरक्षण करण्यासाठी आणि जबाबदार पर्यटन धोरण सुनिश्चित करण्यासाठी औपचारिक आक्षेप आणि सूचना सरकारकडे सादर करणार आहे.

---

# कापड विक्रेते आणि शिंप्यांचा पीएमसी विरोधात बेमुदत आंदोलनाचा इशारा



■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २७ :** जुनी मासळी बाजार इमारत पाडून त्या जागेवर नव्या इमारतीचे बांधकाम करण्याच्या उद्देशाने फोंडा नगरपालिका परिषदेने कापड विक्रेते व शिंपींना स्थलांतरित होण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, विक्रेते व शिंपी स्थानांतरास नकार देत असून, जबरदस्तीने हटवले गेले तर पीएमसी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

पीएमसीकडून मिळालेल्या माहितीनुसार, मासळी बाजाराची जुनी इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने ती पाडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तळमजल्यावर असलेल्या सुमारे १२० मासळी विक्रेत्यांना आधीच नवीन मार्केट कॉम्प्लेक्सच्या तळघरात स्थलांतरित करण्यात आले आहे. आता पहिल्या मजल्यावर व्यवसाय करणाऱ्या सुमारे ७० कापड विक्रेत्यांनाही स्थलांतराचे निर्देश देण्यात आले आहेत.

व्यापारी संघटनेचे नेते घारू सावंत यांनी सांगितले की, आम्ही स्थलांतरास तयार आहोत, पण जुन्या फळे-भाजीपाला बाजारात नाही. आम्हाला पूर्वी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे नवीन मार्केट कॉम्प्लेक्स शेडमध्येच जागा द्यावी. ते पुढे म्हणाले की, मार्केट कॉम्प्लेक्स विक्रेत्यांसाठीच बांधण्यात आले असताना, आम्हाला तिथे व्यवसाय करण्याची संधी का दिली जात नाही, हा प्रश्न आहे.

सावंत यांनी स्पष्ट केले की, इमारत जीर्ण असल्याचे त्यांनाही माहिती आहे आणि त्यांनीही स्थलांतर स्वीकारले आहे, परंतु ती जागा योग्य असावी, हीच त्यांची मागणी आहे. त्यांनी दावा केला की, सध्या स्थलांतर करण्यास सांगितलेल्या फळे-भाजीपाला बाजारालाही लवकरच पाडण्यात येणार असून, नंतर पुन्हा स्थलांतराची वेळ येईल. त्यामुळे आम्हाला स्थिर जागा हवी आहे.

मासळी बाजारात काम करणाऱ्या महिलांनी सांगितले की, त्यांनी अनेक वेळा पीएमसी अधिकाऱ्यांना तसेच मंत्री व स्थानिक आमदार रवी नाईक यांना भेटून आपली मागणी मांडली, परंतु कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. आमच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे, असा आरोप या महिलांनी केला.

मार्केट कॉम्प्लेक्स शेडमध्ये स्थलांतरित झालेल्या काही महिला शिंप्यांनी सांगितले की, नवीन ठिकाणी अजून वीज जोडणी मिळालेली नाही. त्यामुळे शालेय गणवेशांसारखे ऑर्डर असतानाही रात्री काम करता येत नाही. पूर्वी आम्ही रात्री ८ वाजेपर्यंत काम करायचो, पण आता अंधारामुळे संध्याकाळी ६ वाजता काम थांबवावे लागते, असे या महिलांनी सांगितले.

पीएमसीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, इमारत तातडीने रिकामी करून तिचे धोकादायक भाग पाडणे आवश्यक आहे. त्यामुळे उर्वरित दुकानदारांनी लवकरात लवकर स्थलांतर करावे, अशी भूमिका परिषद प्रशासनाने घेतली आहे.

---

# सांडपाणी समस्या आणि जुन्या इमारतींच्या धोक्यांबाबत बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** शहराच्या दीर्घकाळ प्रलंबित नागरी समस्यांवर उपाययोजना आखण्यासाठी , मडगावमध्ये सोमवारी एक महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सखल भागातील सांडपाण्याच्या गंभीर समस्येवर आणि धोकादायक जुन्या इमारतींच्या प्रश्नावर उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. मडगावचे आमदार दिगंबर कामत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत . अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीनेत कोठावळे , मडगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मेलविन वाज, नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

खारेबांध, कोम्बा, मलभाट आणि आके या सखल भागांतील नागरिकांना अनेक वर्षांपासून सांडपाणी ओव्हरफ्लोचा सामना करावा लागत आहे. पारंपरिक गुरुत्वाकर्षणाधिष्ठित ड्रेनेज प्रणाली या भागात अयशस्वी ठरत असल्याने या समस्येचे समाधान अद्याप झालेले नाही.या पार्श्वभूमीवर, अधिकाऱ्यांनी शहरातील पाच उच्च धोका असलेल्या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पंपिंग स्टेशन्स उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या उपायामुळे पावसाळ्यातील पूरस्थिती आणि भरती-ओहोटी दरम्यान सांडपाणी साचण्याचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

बैठकीनंतर आमदार दिगंबर कामत म्हणाले की, सखल भागांतील सांडपाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम उपाय शोधण्यात आले आहेत. जिथे पारंपरिक प्रणाली अपयशी ठरते, तिथे पंपिंग स्टेशन्स हा उत्तम पर्याय ठरतो.सांडपाण्याबरोबरच शहरातील जुन्या इमारतींचा मुद्दा देखील बैठकीत चर्चेचा विषय ठरला. अनेक इमारती तीन-चार दशकांपूर्वीच्या असून त्यांची रचनात्मक सुरक्षितता तपासलेली नाही. त्यामुळे अशा इमारती नागरिकांच्या सुरक्षेला धोका ठरू शकतात, असे अधिकाऱ्यांचे निरीक्षण आहे. या संदर्भात, अशा इमारतींचे सविस्तर मूल्यांकन करण्यासाठी संयुक्त सर्वेक्षण हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित विभागांच्या सहकार्याने हे सर्वेक्षण लवकरच सुरू होईल. धोका म्हणून वर्गीकृत करण्यात येणाऱ्या इमारतींविषयी पुढील योग्य कारवाई केली जाईल, अशी माहिती कामत यांनी दिली. सर्वेक्षण अहवालानंतर जिल्हा प्रशासन तातडीने उपाययोजना सुरू करेल आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गोव्यातील प्रमुख वर्दळीच्या शहरी भागांपैकी एक असलेल्या मडगावमध्ये नागरी सुविधा आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. दोन्ही आघाड्यांवर एकत्रितपणे काम करत, नागरिकांना सुरक्षित, आरोग्यदायी आणि सुसज्ज शहरी जीवनमान मिळावे, हा प्रशासनाचा उद्देश आहे. बैठकीच्या समारोपात, या योजनांची तातडीने अंमलबजावणी करण्यावर सर्वपक्षीय एकमत झाले.

---

# मिठी नदी गाळ प्रकरणात अभिनेता डिनो मोरियावर गुन्हा दाखल

**मुंबई, दि. २७ :**

मुंबईत सोमवारी झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचण्याच्या घटना घडल्या. यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून पावसाळ्यापूर्वीच निर्माण झालेली ही परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे. या पार्श्वभूमीवर नालेसफाई आणि मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

विशेष म्हणजे मिठी नदीतील गाळ उपसण्याच्या कामात झालेल्या कथित गैरव्यवहारासंदर्भात आर्थिक गुन्हे शाखेने अभिनेता डिनो मोरिया यांच्यासह १३ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या तपासानुसार, २०१७ ते २०२१ या काळात देण्यात आलेल्या कंत्राटांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अपहार झाल्याचे समोर आले आहे.

मिठी नदीतील साफसफाई प्रकरणाशी संबंधित चौकशीसाठी डिनो मोरियाला सोमवारी आर्थिक गुन्हे शाखेकडून समन्स बजावण्यात आले होते. तो सकाळी ११ वाजता पोलिस मुख्यालयात चौकशीसाठी उपस्थित झाला व तब्बल आठ तास चौकशी झाल्यानंतर सायंकाळी ७.३० च्या सुमारास बाहेर पडला . डिनोचा भाऊ सँटिनो मोरिया याच्याही चौकशी करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे उपयुक्त संग्रामसिंह निशाणदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या गैरव्यवहारामध्ये तीन महापालिका अधिकारी, पाच



कंत्राटदार, तीन मध्यस्थ व दोन कंपन्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ६५ कोटी ५४ लाख रुपयांच्या अपहाराचा तपास सुरू असून एसआयटी कडून सात ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. चौकशी अधिक सखोल केली जात आहे.

एसआयटीच्या प्राथमिक चौकशीत गाळ टाकण्याच्या जागांबाबत करण्यात आलेले एकूण ९ सामंजस्य करार पडताळण्यात आले, ज्यामध्ये अनेक करार हे खोटे असल्याचे आढळले. काही करारांवर जागेच्या मूळ मालकाची स्वाक्षरी नव्हती, काहींवर तारीखच नव्हती, तर काही स्वाक्षऱ्या बनावट असल्याचेही स्पष्ट झाले. आश्चर्य म्हणजे, एका करारातील व्यक्तीचा २० वर्षांपूर्वी मृत्यू झाल्याचे नोंदले आहे.महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मॅटप्रॉप कंपनीचे यंत्र भाड्याने घेण्यास शिफारस केली. हे यंत्र सुरुवातीला ८ कोटी रुपयांपर्यंत भाड्याने देण्यात आले होते, जे नंतर ४ कोटींवर आणण्यात आले. या प्रक्रियेमध्ये अपारदर्शकता आणि एका विशिष्ट कंपनीला लाभ मिळवून देण्यासाठी केलेल्या हालचाली पोलिसांच्या रडारवर आहेत.

याशिवाय, प्रति टन दरही १६०९ रुपयांवरून २३६६ रुपयांपर्यंत वाढवण्यात आला, त्यामुळे महापालिकेला अतिरिक्त १७ कोटी ७ लाख रुपयांचा खर्च झाल्याचा संशय आहे.मुख्य आरोपी केतन कदम याने डिनो मोरिया व त्याच्या भावाशी अनेकदा फोनवर संवाद साधल्याचे पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत. कॉल रेकॉर्ड आणि आर्थिक व्यवहारांच्या नोंदी तपासल्या जात असून, डिनोचा या व्यवहारांशी नेमका काय संबंध आहे, हे शोधण्याची प्रक्रिया सुरू आहे.

